# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

(अस्पष्ट पत्ता), एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई २१

जावक क्र. मजीप्रा/सस/तांशा.२/ 336 दिनांक २३/२/२००८

// परिपत्रक क्रमांक ९६ //

विषय :- निविदा कलम ३ (क) खाली काढून घेण्यात आलेल्या योजनांच्या उर्वरित कामाकरीता निविदा मागविणे बाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा अंतर्गत विविध नागरी तसेच ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची कामे चालू असुन कामाचा आढावा घेतला असता असे निदर्शनास आले आहे की, निविदेतील विहित मुदतीत कामे पूर्ण होत नाहीत त्यामुळे योजनेचा फायदा लाभार्थ्यांना मिळत नाही त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी / अधिकारी तसेच लोकप्रतिनिधी कडून योजना लवकर पूर्ण करणे बाबत पाठपुरावा होतो . परिणामी वेळावेळी होणाऱ्या बैठकीमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कामकाजावर टिका होते, लोकप्रतिनिधी मार्फत विधीमंडळात तारांकित / अतारांकित प्रश्न उपस्थित केले जातात, तर काही ठिकाणी कामे त्वरित पूर्ण करुन पाणी पुरवठा सुरु करणे बाबत नागरीक तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकाऱ्याकडून उपोषणास बसण्याबाबत नोटीस प्राप्त होतात हे खचितच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या एकूण कामकाजाच्या दृष्टीने योग्य नाही.

कामाच्या विलंबाबाबतचा आढावा घेतला असे लक्षात येते की, प्रमुख कारण म्हणजे निधीची कमतरता, परंतु हे जरी कारण असले तरी ज्या ठिकाणी योजनेसाठी अनुदान प्राप्त आहे, विविध वित्तीय संस्थांकडून कर्ज मंजूर असून प्राप्तही झाले आहे तरी त्याही योजनांची कामे रखडली आहेत अशा योजनांची कामे रखडण्याचे प्रमुख कारण म्हणजे क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी वेळच्या वेळी कामाच्या प्रगतीचा आढावा घेवून निविदेतील विहित मुदतीत काम पूर्ण करण्यासाठी कंत्राटदारापुढे पाठपुरावा न करणे व ठरवून दिलेल्या कार्यक्रमानुसार काम करत नसल्यास कंत्राटातील अटी व शर्तीनुसार योग्य वेळी कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही न करणे असे निदर्शनास आले आहे.

वरील बाब लक्षात घेवून खालील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

i) कामाचे कार्यारंभ आदेश दिल्यानंतर कामे पूर्ण करण्याचा कालबध्द कार्यक्रम तयार करुन त्यास मंजूरी देवून कंत्राटदारास लेखी कळविणे व त्यानुसार कामे पूर्ण करुन घेण्याबाबत वेळोवेळी आढावा घेणे.

ii) मंजूर केलेल्या कार्यक्रमानुसार कामाची प्रगती नसल्यास निविदा कलम.२ नुसार दंडात्मक कार्यवाही करावी

iii) निविदा कलम-२ नुसार दंडात्मक कार्यवाही करुनसुध्दा कामे पूर्ण करण्यास कंत्राटदार असमर्थ ठरत असल्यास अथवा काम पूर्णपणे बंद ठेवले असल्यास निविदा कलम-३ अन्वये दंडात्मक कार्यवाही करावी व ही कार्यवाही करण्यास क्षेत्रीय अधिकारी सक्षम आहेत. त्यास मध्यवर्ती कार्यालयाच्या मंजुरीची आवश्यकता वाटत नाही. या बाबतीत असे निदर्शनास आले आहे की, योजनांची कामे पूर्ण करण्यास कंत्राटदाराकडून विविध कारणांमुळे होणाऱ्या विलंबामुळे त्या योजनांची कामे स्विकृत निविदा कलम ३(क) अंतर्गत काढून घेण्याची कार्यवाही सक्षम अधिकाऱ्यांची परवानगी घेऊन करण्यांत येते. तदनंतर त्या योजनांच्या उर्वरित कामांच्या निविदा पुन्हा मागविणेकरीता परवानगीचे प्रस्ताव क्षेत्रिय कार्यालयाकडून मध्यवर्ती कार्यालयाकडे मंजुरीस्तव प्राप्त होत आहेत . वास्तविक पाहता स्विकृत निविदा कलम ३(क) अंतर्गत मूळ कंत्राटदाराकडून कामे काढून घेतली असतील तर सदरची कामेही निविदेतील अटी शर्तीच्या अधिन राहून तसेच मूळ कंत्राटदाराच्या जोखीम व खर्चाने दुसऱ्या ठेकेदाराकडून पूर्ण करुन घ्यावयाची असतात.याबाबत खात्यावर नव्याने आर्थिक भार पडणार नसतो. त्यामुळे या कामासाठी नव्याने निविदा मागविणेस दयावयाची परवानगी देण्यास ते क्षेत्रिय अधिकारी सक्षम आहेत ज्यांनी कलम ३(क) अंतर्गत काम काढून घेण्याची मान्यता दिली आहे. त्यामुळे अशा प्रकरणी शासनाच्या अथवा मध्यवर्ती कार्यालयाच्या परवानगीची आवश्यकता नाही याची नोंद घ्यावी व या सूचनांनुसार कार्यवाही करावी.

वरील निर्देशाचे काटेकोरपणे पालन करावे व कामे दिलेल्या मुदतीस पूर्ण करावे अन्यथा संबंधीत अधिकाऱ्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

( दीपक भसाळे )
सदस्य सचिव

**प्रत,**

सर्व मुख्य अभियंता, म.जी.प्रा. ठाणे / पुणे / नाशिक / औरंगाबाद /अमरावती / नागपूर.
वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा. नवी मुंबई.
अधीक्षक अभियंता (यांत्रिकी/मुख्यालय/मनिसंस) म.जी.प्रा. नवी मुंबई / नागपूर
सर्व अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा. मंडळ
सर्व कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा. बांधकाम / प्रकल्प विभाग.

TS-I

दूरध्वनी : २८४१५७६/२०२६२४९ फॅक्स : २०२९३४८
ग्राम : पाणीमंडळ, मुंबई.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई-२१.

क्रमांक मजीप्रा/सस/तांशा.२/ ४८९ दिनांक : ९ मार्च २००४

**शुध्दीपत्रक**

विषय :- निविदा कलम ३ (क) खाली काढून घेण्यात आलेल्या योजनांच्या उर्वरित कामाकरिता निविदा मागविणे बाबत.

संदर्भ :- या कार्यालयाचे परिपत्रक क्र. १६ दिनांक २३/२/२००४

संदर्भिय परिपत्रकान्वये निविदा कलम-२ अनुसार कार्यवाही करुनसुध्दा कामे पूर्ण करण्यास कंत्राटदार असमर्थ ठरत असल्यास निविदा कलम-३ अन्वये दंडात्मक कार्यवाही करण्यास क्षेत्रीय अधिकारी सक्षम असल्याचे नमुद करुन त्यात फक्त निविदा कलम ३ (क) नुसार कार्यवाही करण्यास क्षेत्रिय अधिकारी सक्षम असुन त्यास शासनाची अथवा मध्यवर्ती कार्यालयाची परवानगी घेण्याची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट केले होते.

या शुध्दीपत्रकाव्दारे असे निर्देश देण्यात येत आहेत की, निविदा कलम-३ (अ) (ब) व (क) नुसार कार्यवाही करण्यास क्षेत्रीय अधिकारी सक्षम आहेत.

( दीपक भसोळे )
सदस्य सचिव

प्रत,
मुख्य अभियंता, म.जी.प्रा. ठाणे / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर
वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा. नवी मुंबई
अधीक्षक अभियंता, ( यांत्रिकी/ मुख्यालय/ मनिसंसं) म.जी.प्रा. नवी मुंबई / नागपूर
सर्व अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा.मंडळ
सर्व कार्यकारी अभियंता म.जी.प्रा.बांधकाम / प्रकल्प विभाग.